**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कागल **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/08/2019 20:25 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 30/08/2019
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/08/2019
   **Time From (वेळेपासून):** 11:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 11:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 30/08/2019 **Time (वेळ):** 20:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 027 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/08/2019 20:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिष,कागल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीमती संजिवनी श्रीकांत हालभाव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1981 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विराजसिटी अपार्टमंेट, सी बिल्ड,कागल,कागल,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | विराजसिटी अपार्टमंेट, सी बिल्ड,कागल,कागल,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती षालन कष्णात माने | | | 1. केनवडे,कागल,कागल,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | बाळु आनंदा निकम | | | 1. व्हन्नुर पैकी खापणेवाडी,कागल,कागल, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | शंभर रूपयाच्या दहा नोटा | 1,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादी जबाब दिनांक - 30/08/2019मी श्रीमती संजिवनी श्रीकांत हालभावी, वय-38, व्यवसाय-नोकरी (षिपाई) उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल), रा.विराजसिटी अपार्टमंेट, सी बिल्डींग, पहिला मजला, रुम नं. 104, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, मोबाईल नंबर- 8459216080 आज रोजी समक्ष हजर राहून फिर्याद देते की, मी वरील पत्त्यावर सहकुंटुब राहणेस आहे. मी उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल) येथे षिपाई या पदावर कार्यरत आहे. मी कार्यरत असलेल्या कार्यालयामधील कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांनी तीन ते चार दिवसापूर्वी माझी भेट घेवून त्यांनी मला सांगितले की, मी तुमचा 16 नंबरचा फार्म तुम्हाला दिला आहे. तसेच तुमचा पगार देखील सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निष्चती करुन त्या प्रमाणे पगार काढला आहे. त्याकरीता तुम्ही मला 1000/- रुपये द्यावे लागतात असे सांगून, त्यांनी माझेकडे 1000/- रुपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे पैषाची जुळणी झाली की मी तुम्हला भेटते असे सांगितले होते. दिनांक 29/08/2019 रोजी मी नेहमी प्रमाणे उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल) येथे कामावर हजर असताना, कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांनी माझी भेट घेवून त्यांनी माझेकडे 16 नंबरचा फार्म दिला आहे आणि माझा पगार सातव्या वेतन आयोगा प्रमाणे काढला असे म्हणून त्यांनी माझेकडे 1000/- रुपये लाचेचीे मागणी केली. यावरुन त्या माझेकडे लाचेची मागणी करत असलेची माझी खात्री झालेने त्यांचेविरुध्द कारवाई होणेसाठी मी दिनांक 29/08/2019 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत यांच्याकडे फोनवरुन तोंडी तक्रार दिली. त्याचप्रमाणे मी त्यांना जयसिंग तलाव कागलचे समोर रोडवर येण्यास सांगून त्या ठिकाणी माझा तक्रारी अर्ज देत असल्याचे संािगतले. त्यावेळी त्यंानी आम्ही सर्वजण सापळा पथकासह येतो असे सांगितले.त्याप्रमाणे पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत व पेािन.पाटील हे त्यांच्याकडील पथकास मी सांगितलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांनी माझी ओळख करुन घेवून आपली तसेच सोबत असणा-या सर्व स्टाफची ओळख करून दिली. त्यावेळी पंच नं. 1 म्हणुन सौ. गीता षिंदे व पंच नं. 2 म्हणुन श्री.जितेष गायकवाड हे काम करतील असे सर्वानुमते ठरले. त्यांनतर मी माझे सोबत आणलेला माझा तक्रारी अर्ज पोनि.पाटील यांच्याकडे दिला. तो अर्ज त्यांनी वाचून पाहिलेवर मला माझी तक्रार पंचाचे समोर सांगण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर पोनि.पाटील यांनी माझी लेखी तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यावेळी मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी

तक्रार ही एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यावेळी पोनि.पाटील यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे तक्रारी अर्जाच्या खाली सह्या केल्या. तसेच पोनि.पाटील यांनी देखील तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर पोनि.पाटील यांनी मला उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल) येथील कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने या माझेकडे माझा 16 नंबरचा फार्म दिला आहे आणि माझा पगार देखील सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निष्चती करुन काढला आहे म्हणून त्या माझेकडे 1000/- रुपये लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेसाठी भेट घेण्यासाठी माझे गळयामध्ये डिजीटल व्हाईस रेकार्डर अडकवून पंच नं.1 यांचेसह पाठवून देवून पडताळणी करणेचे ठरविले. त्याप्रमाणे पोनि.पाटील यांनी माझेकडे डिजीटल व्हाईस रेकार्डर 16.36 वा. च्या सुमारास चालू करुन दिला. तो रेकार्डर मी माझे गळयामध्ये अडकविला व मला तसेच पंच नं.1 सौ.षिंदे यांना कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांची भेट घेण्यासाठी माझेकडील होंडा अक्टीव्हा स्कुटरवरुन पाठविले. त्याप्रमाणे मी कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांची पंच नं. 1 यांचे सोबत भेट घेतली. त्यावेळी कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांनी माझेकडे माझा 16 नंबरचा फार्म दिला आहे आणि माझा पगार देखील सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निष्चती करुन काढला आहे असे म्हणून त्यांनी माझेकडे 1000/- रुपये लाचेची (बक्षीस) रक्कम मागणी केली. त्यानंतर आम्ही परत पोनि.पाटील हे थांबून असलेल्या ठिकाणी गेलो. त्यावेळी पोनि.पाटील यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 17.56 वा. बंद करुन आपल्या ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि.पाटील यांनी प्रथम पंच नं.1 सौ.षिंदे यांचकडे व त्यानंतर माझेकडे कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांच्या लाचेचे मागणीबाबत विचारपुस केली. तसेच कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने व माझेत तसेच मैल मजुर बाळु निकम यांचेत झालेले डिजीटल व्हाईस रेकार्डरवर ध्वनिमुद्रीत झालेले लागूपुरते संभाषण ऐकले. त्यावरुन कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांनी माझेकडे 1,000/- रुपये लाचेची (बक्षीस) रक्कम मागणी केली असल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाले.त्यावेळी पोनि.पाटील यांनी सर्वानुमते कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांचेविरुध्द लागलीच सापळा कारवाई आयोजित करणेचे ठरविले. त्यावेळी मी पोनि.पाटील यांना कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने या कार्यालयीन वेळ संपलेने निघून गेल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि.पाटील यांनी सर्वानुमते दिनांक 30/08/2019 रोजी सकाळी 10.00 वा. नंतर पंचायत समिती (बांधकाम विभाग) कागल या ठिकाणी सापळा कारवाई आयोजित करणेचे ठरविले. त्याप्रमाणे मला सुचना देवून पोनि.पाटील यांनी दिनांक 30/08/2019 रोजी सकाळी 10.00 वा. जयसिंग तलाव कागलचे समोर रोडवर येण्यास सांगितले.मला दिलेल्या सूचनेप्रमाणे दिनांक 30/08/2019 रोजी मी जयसिंग तलाव कागलचे समोर रोडवर आले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत व पोनि.पाटील हे स्टाफ सह आले. त्यावेळी त्यांनी लागलीच मला व दोन्ही पंचांना त्यांच्याकडील षासकीय टाटा सुमोमध्ये बोलवून घेवून सापळा पुर्व पंचनामा सुरु करत असल्याचे स◌ांगून, मला व दोन्ही पंचांना अथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट बटरीचे गुणधर्म सांगितले. तसेच पोनि.पाटील यांचे सुचनेनुसार मी कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांना देण्यासाठी लाच रक्कम 1000/- रुपये हजर केली. मी हजर केलेल्या लाच रक्कमेतील नोटांना सहायक फौजदार बुचडे यांनी टाटा सुमो मधील मधल्या सिटवर कागद अंथरुन त्यावर चलनी नोटांना अथ्रासिन पावडर लावुन ती लाच रक्कम माझेकडील पर्समध्ये ठेवली. त्यानंतर मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचायांना सापळ्याचे अनुषंगाने पोनि. पाटील यांनी योग्य त्या सुचना देवुन कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यानी लाच रक्कम स्विकारलेचा इशारा म्हणुन मी माझे डाव्या हाताने माझे डोक्यावरुन हात फिरवावा म्हणजे कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांनी लाच रक्कम स्विकारल्याचे तो इषारा समजण्यात येईल असे सांगितले.त्यानंतर पोनि.पाटील यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये नविन मेमरी कार्ड घातले आणि तो रेकार्डर 11.30 वा. चालू करुन माझेकडे दिला. तो मी गळयात अडकवुन मी व पंच नं.1 यांना माझेकडील होंडा अक्टीव्हा स्कुटरवरुन उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल) येथील कनिष्ठ सहायक अनिल नांद्रे यांची भेट घेणेकरीता 11.42 वा. पाठविले. त्यावेळी आमचे पाठोपाठ पोलीस उपअधीक्षक श्री.बुधवंत व पोनि.पाटील तसेच त्यांचेकडील स्टाफ, पंच नं.2 गायकवाड असे त्यांच्याकडील टाटा सुमो व खाजगी मारुती रिझ कार मधून आले. त्यावेळी मी माझेकडील होंडा अक्टीव्हा स्कुटर वरुन कार्यालया समोर गेले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक बुधवंत, पोनि.पाटील, पंच नं.2 व त्यांचे सोबतचा स्टाफ असे कार्यालयाच्या बाहेर रोडवर येवुन थांबुन राहीले. त्यावेळी मी कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांची भेट घेतली. त्यावेळी कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांनी माझेकडे मागणी केलेली 1000/-रुपये लाच (बक्षीस) रक्कम आरोपी लोकसेवक अ.नं.2 बाळु आनंदा निकम, मैल कामगार यांचेकडे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी आरोपी लोकसेवक अ.नं.2 बाळु निकम, मैल कामगार यांची नविन पंचायत समिती, कागल इमारतीच्या पोर्च मध्ये भेट घेतली. त्यावेळी मी माझेकडील पर्समधून 1000/- रुपये लाचेची (बक्षीस) रक्कम माझे उजव्या हाताने काढून त्यांना दिली. त्यावेळी आरोपी लोकसेवक अ.नं.2 बाळु निकम, मैल कामगार यांनी ती लाच (बक्षीस) रक्कम आपल्या उजव्या हाताने स्विकारून ती दोन्ही हाताने मोजुन आपले अंगातील पन्टचे पाठीमागील उजव्या बाजुचे खिशात ठेवली. तेव्हा मी पोनि.पाटील यांचे सुचनेप्रमाणे लाच (बक्षीस) रक्कम स्विकारलेचा इशारा म्हणुन माझा डावा हात माझे डोक्यावरुन फिरवला. त्यावेळी पोनि.पाटील यांनी माझे गळयात अडकविलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर 11.42 वा. बंद करुन ताब्यात घेतला. त्यावेळी पोनि.पाटील यांनी बाळु निकम, मैल कामगार यास त्यांचेकडील स्टाफ मार्फत ताब्यात घेतले. तसेच कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने यांना त्यांच्याकडील महिला पोलीस कर्मचारी मार्फत ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि.पाटील यांनी कनिष्ठ सहायक श्रीमती षालन माने व बाळु निकम, मैल कामगार याच्याकडे त्यांचे नांव, पद व पत्ता विचारला असता, त्यांनी आपली नांवे श्रीमती षालन कृष्णात माने, वय-53, कनिष्ठ सहायक, रा.मु.पो.केनवडे ता.कागल जि.कोल्हापूर व बाळु आनंदा निकम, वय-50, मैल कामगार, दोघे नेमणुक- उपअभियंता बांधकाम, जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल) रा.मु.पो.व्हन्नुर पैकी खापणेवाडी, ता.कागल, जि.कोल्हापूर असे सांगितले. त्यानंतर पोनि.पाटील यांनी बाळु निकम यांच्या हाताची व कपडयाची तपासणी करुन पाहिली. त्यानंतर माझा 16 नंबरचा फार्म व सातवा वेतन आयोगा प्रमाणे करणेत आलेली वेतन निष्चीती, पगाराचा दाखला अषी कागदपत्रे श्रीमती माने यांच्याकडून प्राप्त केली. तसेच त्या ठिकाणची पोनि.पाटील यांनी माहिती घेतल्यानंतर आम्ही सर्वजण षासकीय विश्रामगृह, कागल येथे आलो. एकंदरीत दिनांक 29/08/2019 रोजी उपअभियंता बांधकाम जिल्हा परिषद उपविभाग, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, (पंचायत समिती, कागल) कार्यालयातील श्रीमती षालन कृष्णात माने कनिष्ठ सहायक यांनी माझेकडे माझा 16 नंबरचा फार्म दिला आहे आणि माझा पगार देखील सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निष्चती करुन काढला आहे असे म्हणून त्यांनी माझेकडे 1000/- रुपये लाचेची (बक्षीस) रक्कम मागणी केली व दिनांक 30/08/2019 रोजी करुन ती लाच (बक्षीस) रक्कम आरोपी लोकसेवक बाळु आनंदा निकम, मैल कामगार यांचेकडे देण्यास सांगितलेने बाळु निकम यांनी नविन पंचायत समिती, कागल इमारतीच्या पोर्च मध्ये माझेकडून सदरची रक्कम ही लाचेची असलेचे माहिती असुनसुध्दा सदरची लाच (बक्षीस) रक्कम 1000/- रुपये स्विकारली असता त्यांना अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथील पोलीस निरीक्षक श्री.जितेंद्र पाटील व त्यांचेकडील स्टाफने पकडले आहे. तरी नमूद प्रकरणी माझी त्या दोघांच्या विरुध्द 1000/- रुपये लाचेची (बक्षीस) रक्कम मागणी करून लाच (बक्षीस) रक्कम स्विकारल्याबाबत फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): KUMAR RAMCHANDRA KADAM(I (Inspector)) / 14601000450KRKM7801F **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

SS

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणे अंमलदार कागल पो. ठाणे

**Name** (नाम): KUMAR RAMCHANDRA KADAI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 14601000450KRKM7801F